# सरस्वती मंदिर ट्रस्ट, इंग्लिश माध्यमचे कला-विज्ञान प्रदर्शन

ठाणे, दि.१४ (वार्ताहर)- सरस्वती मंदिर ट्रस्ट, नौपाडा येथील इंग्लिश मिडीयम (सी.बी.एस.इ.) शाळेने कला विज्ञान प्रदर्शन शनिवार दि १०मार्च रोजी सकाळी ९.३०.ते दुपारी १.३० या वेळेत आयोजित केले होते. त्याच बरोबर मुलांच्या वेगवेगळ्या खेळण्यांचे प्रदर्शन आणि पुस्तकप्रदर्शन व विक्रीही आयोजित केली होती.



प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे उद्घाटन कोण्या मोठ्या व्यक्तीच्या हस्ते न करता शाळेतील मोठ्या शिशूच्या विज्ञान प्रयोग सादर करणार्या मुलांच्या हस्तेच करण्यात आले. प्रदर्शनाचा प्रमुख हेतू मुलांच्या रोजच्या शालेय जीवनात ते करीत असलेले विविध उपक्रम व त्यांना मिळालेले अनुभव सादर करणे हा होता.

शाळेत एक वर्गखोली ही संकल्पना नसून प्रत्येक विषयाची वेगळी दालने आहेत. प्रत्येक दालनात त्या विषयाची संपूर्ण माहिती व तयारी करून घेणारी, खेळगटापासून ते मोठा शिशुवर्गापर्यंत विषय खुलवत, स्वानुभवातून शिकण्याची साधने व साहित्य सुयोग्य पद्धतीने मांडली होती व शिक्षिका त्याबद्दल सोप्या शब्दात माहिती देत होत्या. प्रदर्शनात मुलांचे चित्रकला, हस्तकला, ठसेकाम, रंगकाम, कोलाज काम, चिकण मातीपासून केलेल्या विविध वस्तू यांचे अप्रतिम नमुने पहायला मिळत होते. त्यातून प्रत्येक मुलाची/ मुलीची स्वतःची अशी कल्पनाशक्ती प्रदर्शित होत होती. मुलांचे हे कलाविश्व शाळेतील शिक्षकांनी सुंदर पद्धतीने मांडले होते. मुलांनी सादर केलेले वैज्ञानिक प्रयोग आणि त्याचे दिलेले स्पष्टीकरण फारच छान होते. त्यातून मुलांना त्याचे झालेले आकलन दिसत होते. शिक्षकांनी विशेष परिश्रम घेऊन या वैज्ञानिक प्रयोगांसाठी तयार केलेली मुले प्रदर्शनाचा केंद्र बिंदू बनली होती.

संपूर्ण परिसरात मुलांचे असे भावविश्व दर्शवणारे फलक जागोजागी लावले होते.संपूर्ण कार्यक्रमाचे अतिशय सुनियोजन होते व मुलांच्या सादरीकरणातून त्यांच्या शिक्षकांनी करून घेतलेली तयारी दिसत होती. प्रदर्शनासाठी शाळेला सुशोभित करण्यासाठी, लहान शिशूच्या मुलांनी तयार केलेली, झेंडू व आंब्याच्या पानांची ठिकठीकाणी लावलेली तोरणे वातावरण अधिक सुंदर करीत होती. त्याच्या साथीला धीम्या आवाजातील सनईचे सूर वातावरण मंगलमय करीत होते.

हा कला, विज्ञान, साहित्या व खेळ याचा सुंदर मिलाफ असलेला सोहळा उत्तम रीत्या सादर झाला आणि सुनियोजितपणे प्रदर्शनाचा दिवस पार पडला.